जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०३ दिनांक - ०२/०१/२०२४**

समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर

## जादुटोणा सारखे अघोरी कृत्य करून कोटींची फसवणूक करणा-या मुख्य आरोपींना केले जेरबंद

**समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.१९२/२०२३ भा.दं.वि.कलम ३२८,४२०,४०६,१२०(ब),३४ महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनयम २०१३ चे कलम ३** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

फिर्यादी व साक्षीदार इसम या व्यावसायिकाची २ कोटी ४० लाख ५५ हजार फसवणूक झाली होती. त्याबाबत दि.२९/०८/२०२३ रोजी समर्थ पोलीस स्टेशन या ठिकाणी एकूण ०६ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात पोलीसांनी एम.पी.आय.डी अन्वये कलमवाढ केलेली आहे. दरम्यानच्या काळात सदर आरोपींवर कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ९८७/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०,४०६,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे व गुन्हा रजिस्टर नं.१२६६/२०२३,भा.दं.वि.कलम ४२०,४०६,३४,महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थामधील हितसंबधाचे संरक्षण अधिनियम कलम ३,४ प्रमाणे एकूण २ कोटी ७६ लाख रुपयांची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. तसेच **लष्कर पोलीस स्टेशन या ठिकाणी देखील गुन्हा रजिस्टर नं.२५२/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०,४६७,४७०,४७१,३४** प्रमाणे फिर्यादी यांची एकुण रक्कम १ कोटी ०६ लाख ५० हजार रूपयांची फसवणूक केली, म्हणून गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. गेल्या ०४ महीन्यांमध्ये तीन वेगवेगळया पोलीस स्टेशनला चार गुन्हे मिळून एकुण रक्कम ०६ कोटी २३ लाख ०५ हजार इतक्या रूपयांची फसवणूक केल्याने गुन्हे दाखल झालेले आहेत.

सदर आरोपींना तात्काळ अटक करण्याचे आदेश मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी वेगवेगळया तपास यंत्रणेला दिलेले होते. समर्थ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सूरज बंडगर व पोलीस निरिक्षक,(गुन्हे),श्री.प्रमोद वाघमारे यांनी तपास पथकाला आरोपींचा शोध घेण्यास सांगितले. आरोपींनी ०४ महिने त्यांचे घर लॉक करून फरार झाले होते. आरोपींना शोधण्याचे पोलीसांना मोठे आव्हान होते. परंतू पोलीस उप-निरी.सौरभ थोरवे व पोलीस अंमलदार,हेमंत पेरणे यांनी तांत्रिक विश्लेषण केले व बातमीदारामार्फत गोपनीय माहीती काढली की, **सदर गुन्हयातील मुख्य आरोपी १.अब्दुल हुसेन हसनअली नईमआबादी २.महीला आरोपी सीमा उर्फ रोहा अब्दुल हुसेन नईमआबादी** हे कॅम्प परिसरात सोसायटीत लपून बसलेले आहेत. सदरची माहिती वरिष्ठांना कळवून व वरिष्ठांच्या आदेशाने स्टाफच्या मदतीने दोन्ही आरोपींना सापळा रचून सदर सोसायटीमधून ताब्यात घेतले. सदर आरोपींना समर्थ पोलीस स्टेशन येथे आणून अटक करण्यात आले. सदर आरोपींना मा. कोर्टात हजर केले असता आरोपींना ०५ दिवस पोलीस कस्टडी रिमांड दिलेले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उप आयुक्त,परि-१,पुणे शहर,श्री.संदीप गिल, मा.सहा.पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे,श्री.अशोक धुमाळ, समर्थ पो.स्टे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सूरज बंडगर, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.प्रमोद वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक,सौरभ थोरवे, ज्योती कुटे, सपोफौ. दत्तात्रय भोसले, पोलीस अंमलदार, हेमंत पेरणे, संतोष डमाळे, गणेश वायकर, प्रमोद जगताप, शरद घोरपडे, प्रफुल्ल साबळे, म.पोलीस अंमलदार, निलम करपे, सीमा गायकवाड, स्वाती भालेराव यांनी केली आहे.